# महात्मा गांधी यांचे धर्म व समता विषयी विचारांची समकालीन प्रस्तुतता

**डॉ.प्रमोद जगन्नाथ पाटील** सहयोगी प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग माऊली महाविद्यालय, वडाळा (सोलापूर)

भ्रमणध्वनी-9552529337 Email -pramod24patil@gmail.com

---

**प्रस्तावना:-** भारतीय राजकीय विचार परंपरेमध्ये क्रियाशील, मानवविद्या शाखेला दिशादर्शक ठरलेले तत्त्वचिंतक विचारवंत म्हणून महात्मा गांधीजींना ओळखले जाते. सत्य, अहिंसा, सत्याग्रह, विश्वस्त सिद्धांत, सर्वोदय विचारप्रणाली या आधारे समाज निर्मिती करण्याचा मार्ग दाखवणारे विचारवंत म्हणून देखील महात्मा गांधीचे नाव ओळखले जाते. विधायक नैतिक मूल्यांच्या आधारावरती समाज निर्मिती झाली पाहिजे असा त्यांचा आग्रह होता. आजच्या कालखंडामध्ये राजकारणामध्ये धर्माचा असलेले स्थान, धर्माचा राजकारणासाठी करण्यात येणारा वापर, धार्मिक राजकारणासाठी समाजाचे होणारे विभाजन, समाजामध्ये त्यातून निर्माण होणारी हिंसा, प्रशासकीय व्यवस्थेवरील ताण, परस्पर अविश्वासाचे वातावरण, स्वतःचाच धर्म श्रेष्ठ, यांसारख्या असंख्या प्रश्नांना माझ्या मते, महात्मा गांधीजींचे धर्म विषयी व समता विचार दीपस्तंभ सारखे दिशादर्शक ठरू शकतात. याच प्रश्नांचा विचार करून सदर संशोधन पेपर मध्ये महात्मा गांधी यांचे धर्म व समता विषयी विचारांची समकालीन प्रस्तुतता या विषयावर मांडणी करण्यात आली आहे.या संदर्भात नलिनी पंडित असे मत नोंदवतात की, "गांधीजींनी जन्मभर राजकारण केले तरी देखील जॉर्ज वॉशिंग्टन, अब्राहम लिंकन, जोसेफ मझिनी, डीव्हलेरा यांच्यासारख्या जगविख्यात राजकीय नेत्यांच्या पंगती त्यांना बसवता येणार नाही. कारण त्यांचा पिंड मुलत: गौतम बुद्ध, येशू ख्रिस्त, ज्ञानेश्वर, कबीर यांच्यासारख्या धर्मात्माच्या गुणांचा होता. आत्मसाक्षात्कार,ईश्वर दर्शन व सत्याचा शोध हे त्यांनी आपले अंतिम उद्दिष्ट मानले होते. राजकारण हा अध्यात्म साधनेचा व सत्याचा प्रयोगाचा एक भाग आहे अशी त्यांची धारणा होती म्हणून त्यांनी आपल्या राजकीय चळवळीत तत्त्वनिष्ठेचा, साधनसूचीतेचा सतत आग्रह धरला. गीता,बायबल तुलसीरामायण, कुराण अशा धर्मग्रंथांचे त्यांच्या मनावर खूपच खोलवर संस्कार झाले होते परंतु कोणत्याही प्राचीन व मध्ययुगीन संप्रदायाच्या विशिष्ट चौकटीत त्यांनी आपली धर्म भावना बंदिस्त करून ठेवली नाही उलट त्यांच्या धर्म विचारात आधुनिक ऐहिकनिष्ठ उदारमतवादाचे पडसाद जागोजाग उमटलेले आहेत." [१](गांधी,नलिनी पंडित,पृ.क्र.2)

गांधीजींची धर्माकडे पाहण्याची हीच दृष्टी आजच्या कालखंडामध्ये प्रस्तुत ठरते. राजकीय व्यवस्थेमध्ये राज्यकर्त्यांची दृष्टी धर्माबाबतीत काय असावी? या प्रश्नाचा शोध सदर संशोधन पेपर मध्ये घेण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. इहवादी विचारवंत म्हणजे धर्माला विरोध करणारा अशी सर्वसामान्यपणे समजत असते. परंतु धर्म हे सामाजिक जीवनाचे एक अंग असल्यामुळे मानवी जीवनात धर्माचे स्थान काय? कोणत्या दृष्टिकोनातून धर्माकडे पहावे? विज्ञाननिष्ठ समाजामध्ये आज धर्माचे वाढलेले प्रस्थ? भारतीय राज्यघटनेची धर्माकडे पाहण्याची दृष्टी आणि गांधीजींची दृष्टी या प्रश्नांच्या अनुषंगाने सदर संशोधनांमध्ये अभ्यास करण्यात आला आहे.

गृहीतके :-

1) गांधी धर्मनिष्ठ होते परंतु धर्माला सहिष्णू व सर्वसमावेशक मानतात.
2) गांधी धर्म ही बाब राजकारणापासून अलिप्त मानत नाहीत.
3) ‘धर्म म्हणजे कर्म’ असा गांधीजींचा धर्माकडे पाहण्याचा दृष्टिकोन होता.
4) 'नीती तो धर्म' धर्म नैतिक समाज निर्मितीसाठी आवश्यक आहे अशी गांधीजींची भूमिका होती.
5) सर्व धर्मातील प्रगमनशील तत्वे गांधी धर्म विचारात स्वीकारहार्य मानतात.
6) धर्म समाज निर्मितीचा पाया ठरू शकतो अशी गांधीजींची भूमिका होती.

उद्दिष्टे :-

1) गांधी धर्मनिष्ठ होते का? तसेच धर्म विचारांची सहिष्णु व सर्वसमावेशक मांडणी करतात का ते पाहणे.
2) गांधी धर्म व राजकारण या दोन बाबींमध्ये फरक करतात की नाही ते पाहणे.
3) धर्म म्हणजे कर्म ही गांधीजींची भूमिका समजावून घेणे.
4) नैतिक समाज निर्मितीतील धर्माची भूमिका याविषयी गांधीजींच्या विचारांचा अभ्यास करणे.
5) गांधीजी सर्व धर्मातील प्रगमनशील तत्वे धर्म विचारांमध्ये कसे स्वीकारतात याचा अभ्यास करणे.
6) गांधी आधुनिक समाज निर्मितीचा पाया धर्म हा घटक ठरू शकतो याविषयी त्यांचा दृष्टिकोनाचा अभ्यास करणे.

**विषय प्रवेश:-** भारतीय प्रबोधन परंपरेतील अनेक थोर विचारवंतांनी धार्मिक सुधारणेच्या अंगाने प्रयत्न केले. गांधी देखील या परंपरेतीलच एक मानव वैज्ञानिक आहेत. गांधी हे उदारमतवादी धर्म सुधारकांच्या परंपरेतील एक आहेत. त्यांच्या वैचारिक संक्रमणाच्या काळामध्ये धर्म कल्पनांचा पगडा त्यांच्यावरती होता. मात्र स्वतःच्या सत्संग विवेक बुद्धीच्या विकासावरती गांधींनी पाश्चात्त्य, भारतीय अशा दोन्ही संस्कृतीतील ग्राह्य आत्मसात करून त्यांनी स्वतःचे असे एक सुसंगत तत्त्वज्ञान बनवले. या तत्त्वज्ञानामध्ये त्यांनी धर्माला सर्वोच्च स्थान दिले परंतु गांधींची धर्म संकल्पना भिन्न होती. 'धर्म म्हणजे नीतीधर्म' या दृष्टीने धर्माकडे पाहतात. गांधीजींची धार्मिक प्रवृत्ती पुढील त्यांच्या विधानावरून स्पष्ट होते ते म्हणतात, "माझ्या राजकीय सामाजिक आर्थिक अशा विविध कार्याची प्रेरणा धार्मिक आहे. धर्म हेच माझे जीवनाचे प्राण तत्व आहे त्याशिवाय मी एक क्षणभर ही जगू शकत नाही." [2] (आर के प्रभू आणि यु.आर. राव (सं) द माइंड ऑफ महात्मा गांधी, पृष्ठ क्र. 102) गांधीजींची अशी धरणा होती की धर्म ही मानवी मनाची मूलभूत गरज आहे. त्यादृष्टीने धर्म हाच जगाचा आधार आहे परंतु जन्मनावर आज धर्माचा प्रभाव पडत नाही कारण संकुचित सांप्रदायिकतेमुळे धर्माचे मूळ तेजस लुप्त होऊन गेलेले आहे. धर्मातील मालिन्य व मिथ्या चार नाहीसे होऊन त्याचा शुद्ध स्वरूपाची माणसाला ओळख पटली तर भविष्यकाळात पृथ्वीतलावर सत्याधिष्टीत पवित्रमय धर्माचे साम्राज्य नांदेल अशी गांधीजींची भावना होती. लोकांना खऱ्या धर्माची शिकवण देऊन सामाजिक व्यवहाराची शुद्धीकरण करण्याची जिद्द गांधीजींनी बाळगली होती.

गांधी आपल्या आत्मकथेच्या प्रस्तावनेत म्हणतात,"माझ्या प्रयोगामध्ये तरी आध्यात्मिक म्हणजे नैतिक,धर्म म्हणजे नीती, आत्म्याच्या दृष्टीने पाळावयीची नीती तो धर्म"[3] (पटवर्धन सी.पु., महात्माजींचे सत्याचे प्रयोग अथवा आत्मकथा (अनुवाद) प्रस्तावना पृ क्र.7) असे नि:संदिग्धपणे पणे सांगतात. धर्म म्हणजे नीती हा धर्माचा अर्थ स्पष्ट करताना गांधीजी म्हणतात, नीतीचा संबंध सामाजिक व्यवहारांशी असतो. माणसातील परस्पर संबंध ठरवणारी सामाजिक संस्थांना पायाभूत असणारी जी तत्वे असतात त्यांनाच नीती मूल्य असे म्हणतात. मानवाचे पशु प्राण्यांपेक्षा वेगळेपण असे की, त्याचे स्वयंसिद्ध प्रतिष्ठास सर्व मानवांची समानता आणि मानव जातीचे मूलभूत ऐक्य या तत्त्वांचे आधुनिक काळातील मानवतावादी विचारांना अधिष्ठान आहे. मानवतेची प्रतिष्ठा हाच गांधीजींच्या तत्व विचारांचा केंद्रबिंदू आहे. सामाजिक जीवनाचा आधार धर्म (नैतिकता) ठरला पाहिजे यासाठी गांधीजींनी अखेरपर्यंत कायम धडपड केली. लौकिक व्यवहारापासून धर्माची फारकत करता येणार नाही असा गांधीजींची भूमिका होती.कौटुंबिक कलह,सामाजिक जीवनातील तणाव, दंगली, सत्ताधाऱ्यांचे जुलूम, दडपशाही, आंतरराष्ट्रीय तंटे,वाद हे सर्वच प्रश्न धर्माच्या आधारावरती व्यवहार केल्यास म्हणजेच सत्य व अहिंसेच्या आधाराने सोडवता येतील असा गांधींचा दावा होता.[4] ( गांधी, 'नॉन व्हायलंन्स इन पीस अँड वॉर' पृष्ठ क्र.392) मानवाचे जीवन हे प्रगमनशील असून त्याच्या श्रेष्ठत्वाचा आधार सत्सदविवेक बुद्धी व नीती धैर्य हेच आहेत असे गांधी स्पष्ट करतात.

जगाचे नियमनाचे तत्व नैतिक असावे नैतिकतेच्या स्फुरण हाच मनुष्याच्या जीवनाचा आधार असावा अशी गांधींची भूमिका होती. नैतिकता म्हणजेच धार्मिक श्रद्धा असा गांधी अर्थ प्रतिपादित करतात. नैतिकता(धर्म) हाच विश्वातील परस्पर व्यवहाराचे मुख्य आधार ठरल्यास सत्याचा निश्चित विजय आहे म्हणून प्रत्येकाने आपला व्यवहार धर्माच्या आधारावरती करावा अशी गांधीजींची भूमिका होती. इथे गांधी धर्म म्हणजे उच्चतम कोटीतील नैतिकता असा त्यांना अर्थ अपेक्षित आहे. जगातील प्रत्येक संघर्षाला उत्तर म्हणजे उच्चतम कोटीतील नैतिकतेचे पालन करणे हा गांधी विचार आजच्या कालखंडामध्ये समकालीन प्रस्तुत ठरतो. गांधीजींच्याच भाषेत सत्य म्हणजे परमेश्वर होय. "जगातील सर्व नियमनामध्ये नैतिकतेचे तत्व, मनुष्यमात्राच्या सद्भावनेवर व अंत:शक्तीवर आढळ विश्वास,जीवनातील सर्व तऱ्हेच्या अ-शिवाशी व अन्यायाशी झगडण्याची प्रेरणा आणि साधनशुचितेचा आग्रह हे गांधीजींच्या मानवतावादी तत्त्व विचारांचे चार मुख्य पैलू होते."[5] (गांधी, नलिनी पंडित, पृष्ठ क्रमांक-3) परमेश्वरावरील दृढ श्रद्धेतूनच गांधीजींचे सत्याग्रहाचे तत्त्वज्ञान हे निर्माण झाले होते. 'शठं प्रति सत्य' हा जीवन मार्ग अधिक मुलगामी व सम्यक दृष्टीचा आहे असा सत्याग्रह दर्शनाचा मुख्य सिद्धांत मानतो. गांधीजींची भूमिका विचारांच्या बाबतीमध्ये स्पष्ट होती ते म्हणतात, त्या त्या क्षणाला जे सत्य प्रतीत होईल ते तसेच लोकांपुढे मांडणे गांधीजींना महत्त्वाचे वाटते. आपले आजचे विधान पूर्वीच्या विधानाशी सुसंगत आहे किंवा नाही याचा विचार करण्याची त्यांना कधीच आवश्यकता वाटली नाही. जर कुणाला त्यांच्या विधानात विसंगती दिसून आली तर नंतरचे विधान प्रमाण मानावे,[6] (महात्मा खंड, पाच पृ. क्र. 206) असे गांधी सांगतात. गांधीजींच्या धर्मविषयक विचारांमध्ये हिंदू धर्मातील अध्यात्मवाद याचा प्रभाव जाणवतो परंतु पुढे पाश्चात्य संस्कृतीशी संबंध आल्यानंतर हिंदू धर्मातील जुन्या संकल्पनात सुधारणा करून इहवादी विचार मांडले. गांधीजी आपल्या धर्मविषयक विचारांमध्ये भौतिक व आध्यात्मिक अशी फारकत करत नाहीत. गांधीजींच्या मते, "सामान्य माणसांच्या प्राथमिक गरजा भागल्याशिवाय अध्यात्माकडे वळत नाहीत तेव्हा त्यांच्या दृष्टीने आर्थिक हेच अध्यात्मिक होय."[7] (गांधी, नलिनी पंडित, पृष्ठ क्र.8)

गांधीजींच्या मते, "समाजापासून दूर जाऊन ईश्वर चिंतनात मग्न झाल्याने माणसाची अध्यात्मिक प्रगती होत नाही, तर भोवतालच्या जीवनाशी समरस होऊन लोकांचे प्रश्न सोडवणे त्यांच्या जीवनाची नैतिक पातळी उंचावणे हाच खरा ईश्वर भक्तीचा मार्ग आहे."असा गांधी प्रणित मानवतावादी विचारांचा आशय आहे.[8] ( गांधी नलिनी पंडित, पृ. क्र.8)

गांधीजींचा शरीर स्वास्थ्याबद्दल आग्रह होता मात्र सुखासिंतेला त्यांचा विरोध होता. माणसांना त्यांच्या भौतिक गरजा वाढवत नेण्यास उत्तेजन देणाऱ्या आधुनिक उद्योग प्रधान संस्कृतीचा ते विरोध करतात. गांधी धर्मनिष्ठ कोण? या प्रश्नाचे उत्तर देताना असे स्पष्ट करतात की, स्वतःच्या शूद्र स्वार्थाच्या पलीकडे जाऊन समाजाच्या कल्याणासाठी जो आपले जीवन सर्वस्व वेचतो त्यालाच उच्च प्रकारचा आध्यात्मिक आनंद मिळतो, तोच खरा धर्मनिष्ठ असतो यावरून गांधीजींच्या धर्म संकल्पनेची स्पष्टता होते. समाज स्वास्थ्यासाठी उच्चतम नैतिक आचरण करणे व नैतिक व्यवहार करणे म्हणजे धर्म हे स्पष्ट होते.

**धर्म ग्रंथ प्रामाण्य मानत नाहीत:-** गांधी हिंदू धर्म ग्रंथ व भारतीय परंपरा यांच्या बद्दल आदर बाळगत असले तरी ते धर्मग्रंथांचे व परंपरेचे निरपवाद प्रामाण्य मानत नाहीत. प्रत्येक धर्माचा उदय परमेश्वरी प्रेरणेतूनच झालेला आहे. धर्म हा शब्द उच्चारला की हिंदू, बौद्ध, जैन, ख्रिस्त, इस्लाम, पारसी, असे धर्म आपल्या दृष्टीसमोर उभे राहतात. परंतु गांधीजींची धर्म कल्पना परंपरागत धर्म कल्पनेपेक्षा वेगळी होती. सांप्रदायिकतेचा व साचेबंदपणाचा त्यामध्ये लवलेश नव्हता.धर्मामध्ये सामान्यतः ईश्वर,सृष्टी व मानव यांच्यासंबंधी मूलभूत विचार मानवाचे जीवित साफल्य, नीतिमिमांसा, उपासना पद्धती व नित्य निर्मितीक आचार या गोष्टींचा समावेश होतो. गांधी सकाळ संध्याकाळ नियमाने प्रार्थना करत परंतु पूजाअर्चा, तीर्थयात्रा जप इतक्यांदी बाबींना ते फाटा देतात. स्वतःच्या धर्मातील उपासना पद्धतीला व कर्मकांडाला आवाजही महत्व देऊन इतर धर्मियांना कमी लेखण्याची त्यांची वृत्ती नाही. सर्वधर्म पवित्र आहेत, प्रत्येक मनुष्याला धर्माच्या द्वारे स्वतःची भौतिक परमार्थिक उन्नती साधता येईल, सर्व धर्मांच्या मुळाशी एक शाश्वत धर्म आहे, तोच विश्वधर्म होय अशी गांधींची भूमिका होती. गांधीजींचे धर्म कल्पना माणसाच्या मनात उपजत नीतीची मूलतः जी प्रेरणा असते त्यावरती आधारलेले आहे. प्रत्येक मानवाच्या अंत:करणांमध्ये उपजत चांगली भावना असते. मानवाच्या अंतःकरणातील चैतन्यामुळे प्रत्येकाला निर्णय स्वातंत्र्य असते त्यातून नीती अनितीचा प्रश्न उत्पन्न होतो. मनुष्यमात्रातील या चैतन्याच्या विश्व नियामक चैतन्याशी निकटचा संबंध असतो. हे चैतन्य म्हणजेच परमेश्वर अशी गांधीजींची भूमिका होती. परमेश्वरशासन हे नैतिक आहे म्हणून मानवाच्या हृदयात नैतिक भावनांचे स्पंदन होते. स्वतःच्या मनातील या चैतन्यमय नैतिक प्रेरणेला प्रतिसाद देण्यासाठी केलेले आचरण म्हणजेच धर्मपालन होय अशी गांधीजींची भूमिका होती. गांधीजींच्या मते, महापुरुष कितीही मोठा असला तरी त्याची शिकवण अपूर्णच अपूर्णच राहणार यात शंका नाही. प्रत्येक धर्मग्रंथात त्या त्या काळातील नीती कल्पनांचा आविष्कार झालेला असतो. विश्वाचे शासन करणारी तत्व नैतिक आहेत परंतु कोणत्याही देशातील सामाजिक जीवनात ती तत्वे पूर्णपणे मूर्त स्वरूपात अवतरलेली नाहीत.

**गांधींच्या धार्मिक विचारावरील प्रभाव-** गांधी धार्मिक प्रवृत्तीचे असून देखील चिकित्सक वृत्तीचे असल्याकारणाने कोणत्याही धर्माच्या आहारी जात नाहीत. प्रत्येक धर्मातील प्रगमनशील तत्वे गांधी स्वीकारतात. समाजाच्या उन्नतीसाठी जे पूरक आहे ते स्वीकारहार्य आहे ही गांधीजींची धर्माबाबत भूमिका दिसते. कर्मकांड, मूर्तीपूजा, मानव समतेला नाकारणाऱ्या धार्मिक प्रवृत्तींना गांधी फाटा देतात. गांधी केवळ भारतीय धर्म श्रेष्ठ असे मानत नाहीत, ते पाश्चात्य धर्मातील बाबींचा देखील स्वीकार करतात. परिणामतः गांधींच्या धर्म विचारांवरती विविध धर्म विचारांचा पडलेला प्रभाव थोडक्यात आढावा येथे मांडण्यात आला आहे. (संशोधन पेपरच्या मर्यादेमुळे विस्तृतपणे मांडणी करण्यात आलेली नाही.)

**1) जैन धर्म**-जैन धर्मातून गांधींनी अनेकांन्त, अहिंसा, व्रतभाव, या संकल्पना स्वीकारल्या आहेत. जैन धर्मातील स्यादवादाचा स्वीकार करतात. मात्र गांधीना जैन धर्मातील वैराग्य प्रवृत्तीचे आकर्षण असले तरी धर्म साधनेतील कायक्लेश त्यांना मान्य नव्हता. गांधींनी जैन धर्मातील निवृत्तीवादाला सामाजिक कृती प्रवणतेची जोड दिली. अहिंसा, सत्य, अस्तेय,ब्रह्मचर्य,असंग्रह अस्वाद या जैन तीर्थकारांनी घालून दिलेल्या व्रतचरणाच्या नियमांचा त्यांनी आपल्या धर्म विषयी विचारांमध्ये स्वीकार केला.

**2) प्रणामी पंथाचा प्रभाव**-गांधींची आई पुतळाबाई यांचे वडील प्रणामी पंथाचे अनुयायी होते. 18 व्या शतकामध्ये प्राणनाथ नावाच्या साधनीय पंथाची स्थापना केली होती. पंथाचा मूळ उद्देश धर्माचे ऐक्यावर भर देणे हा होता. ईश्वर अल्ला एकदमच गजर होत असे. या पंथाचा मूर्ती पूजेला विरोध होता. मांस तंबाखू इतर मादक पदार्थ तसेच विवाहबाह्य संबंध हा पंथ वर्ज्र मानत असे. गांधी इंग्लंड मध्ये शिक्षणासाठी जात असताना त्यांच्या आईने ज्या त्यांना शपथ दिल्या होत्या त्यामध्ये

प्रणामी संप्रदायाची शिकवण प्रतिबिंबित होते[9] (संदर्भ-प्यारेलाल,(1965) पृष्ठ क्र.214) गांधी धर्म, व्यवहार आणि एकात्मता यामध्ये समन्वय साधण्याची श्रेय कौटुंबिक पातळीवरती मिळालेल्या शिकवणीस देतात.

**3) रायचंदभाई प्रभाव**-रायचंदभाई हे हजारो रुपयांचा व्यापार त्या कालखंडामध्ये करत असत हिऱ्याचे व्यापारी असून देखील त्यांचा विषय पुरुषार्थ, आत्मओळख, हरीदर्शन हेच होते. रायचंदभाई यांची वृत्ती स्थिर होती. गांधी म्हणतात, प्युरिटन क्केकर तत्त्वांच्या प्रभावाखाली येऊन ख्रिस्ती धर्माची दिक्षा घ्यावी असे माझे मन झाले होते. त्यावेळेस रायचंदभाई यांच्या विचारांमुळे मी परावृत्त झालो.आपल्या जीवनावर पडलेल्या तीन प्रभावशाली विचारांमध्ये गांधी टॉलेस्टॉय,रस्किन व रायचंदभाई यांचा समावेश करतात.

4) टॉलस्टॉय- The kingdom of God is within you या पुस्तकाचा गांधींवरती प्रभाव होता. ख्रिश्चन धर्मातील धर्माच्या नावाखालील जे कर्मकांड सुरू होते त्यावरती यांनी कठोर टीका केली होती. ख्रिस्ती धर्माच्या प्रतिज्ञेमध्ये टॉलस्टॉय यांनी भर घातलेली होती. त्या पाच प्रतिज्ञांचा गांधीजींवरती प्रभाव होता. रागावू नका, विषयासक्त होऊ नका, दृष्टाचा प्रतिकार हिंसेने करू नका, शपथ घेऊ नका, शत्रूवर प्रेम करा. या आज्ञा पाळणाऱ्यांना ईहलोकीच स्वर्गप्राप्तीचा आनंद मिळवता येईल असा टॉलस्टॉय यांचा बुद्धिवाद होता. आपल्या धर्म विषयी विचारांमध्ये गांधी टॉलस्टॉय विचारांचा स्वीकार करतात. आत्मिक शक्तीचा विचार टॉलस्टॉय यांच्या विचारातून गांधींनी घेतला होता. गांधींच्या अराज्यवादी विचारांवरती देखील टॉलस्टॉय यांच्या विचारांचा प्रभाव होता. अराज्यवादी विचारसरणी प्रस्थापित करण्यासाठी धर्म नष्ट करण्याची आवश्यकता नाही. खरा धर्म समजून घ्यावा व त्या आधारावरती नव्या अराज्यवादी समाजाची उभारणी करावी असे टॉलस्टॉय त्यांचे विचार होते.

5) रस्किनच्या विचारांचा प्रभाव- गांधींच्या धर्मविषयक विचारांवरती रस्किनच्या 'अन् टू धिस लास्ट' या पुस्तकातील तीन तत्त्वांचा प्रभाव पडला. सर्वांच्या कल्याणातच आपली कल्याण आहे. प्रत्येकाच्या कार्याचे समान मूल्य असले पाहिजे कारण प्रत्येकाला जगण्याचं समान हक्क आहे. श्रमिक जीवनाला प्रतिष्ठा प्राप्त झाली पाहिजे. या तीन तत्त्वाच्या आधारे गांधींनी आपल्या धर्मविचारांमध्ये मानवतावाद, समता या मूल्यांची मांडणी केली.

**6) सॉक्रेटिस-**अन्यायी धार्मिक तत्त्वांचे पालन बुद्धिनिष्ठ व्यक्तींनी करू नये या विचारांचा प्रभाव गांधींनी सॉक्रेटिस पासून घेतलेला होता. सॉक्रेटिस यांचा स्वतःला ओळखा (नो दायसेल्फ) या संदेशाने गांधी प्रभावित झालेले होते.

**7) प्युरिटन क्केकर चळवळ-** प्रोटेस्ट धर्मगुरूंना विरोध करून समतेच्या व लोकशाहीच्या पायावर उभारणी केलेली चळवळ म्हणजे प्युरिटन क्केकर चळवळ होय. मानवाची नैतिक कर्तव्य कोणते? या धर्मशास्त्रा पुढील प्रश्नाचे उत्तर हिंदू धर्म व कॅथॉलिक संप्रदाय यांनी दिलेले प्युरिटन क्केकर चळवळ नाकारते. त्यांच्या मते, परिस्थितीनुसार जो व्यवसाय प्रत्येकाला प्राप्त झाला असेल तो कर्तव्य बुद्धीने पार पाडणे हाच परमेश्वराला संतुष्ट करण्याचा मार्ग आहे.स्वतःचे कार्य करणे म्हणजेच परमेश्वर प्राप्तीचा मार्ग या संदेशाचा गांधीजींवरती प्रभाव होता. व्यक्तीने धार्मिक हेतूने किंवा वैयक्तिक सुखदुःखाचे लाभ याचा विचार न करता नैतिक कर्तव्यासाठी आयुष्य वेचले पाहिजे, या धर्माची शिकवण होती. गांधींच्या मते,स्वतःच्या बुद्धीला प्रमाण मानून कार्य पूर्तता करावी. हा विचार प्युरिटन क्केकर चळवळीने मला दिला.

या विचारांवरून गांधी हे सर्व धर्मातील प्रग्मनशील तत्वे स्वीकारतात हे गृहीतक स्पष्ट होते.

**धर्मातील विसंगत बाबींना छेद :-** गांधीजी पारंपारिक धर्म कल्पनांना वेगळा अर्थ देतात. गांधी मानव केंद्रित पारंपरिक धर्मातील संकल्पनांचे स्वीकार करतात. गांधीजींच्या मते, धर्माच्या म्हणजेच शाश्वत नीती मूल्याशी विसंगत असणारी तत्वे झुगारून दिली पाहिजेत. बालविवाह, असमंतवैधव्य, देवदासीची प्रथा,जन्मसिद्ध उच्चनीचभाव, अस्पृश्यता यांसारख्या अनैतिक चालींना शास्त्राचा आधार असणे शक्यच नाही. "अस्पृश्यता शास्त्रानुसार आहे, असे सांगण्यास माझ्याविरुद्ध सारा हिंदू समाज जरी एक वटून उभा राहिला तरी तो मी कधीच मान्य करणार नाही कारण सद्सद्वविवेकद्धीच्या बाबतीत बहुमताने निर्णय घेण्याचे तत्व लागू पडत नाही." [10] (गांधी, हिंदू धर्म, पृ. क्र.295) यावरून गांधी हे खऱ्या अर्थाने सुधारक विचारांच्या असल्याचे स्पष्ट होते. पारंपारिक शास्त्रातील अमानुष तत्वे मानवतावादाच्या विरोधात असतील तर ती नाकारण्यास गांधी कचरत नाहीत उलट अशा प्रथा परंपरा विरोधात एकसंघपणे लढा देण्याचे नेतृत्व गांधीजी करतात. गांधी हिंदू धर्माप्रमाणेच इतर धर्मातील देखील अमानुष प्रथा परंपरांना विरोध करतात. अफगाणिस्तान मधील अहमदिया पंथाच्या दोन माणसांना अपराधासाठी ठेचून मारण्यात आले. कुराणाला ही शिक्षा मान्य आहे.काही मुस्लिम पुढाऱ्यांनी या शिक्षेचे समर्थन केले. मात्र गांधींनी यावेळी 'यंग इंडिया' साप्ताहिकात दोन लेख लिहून या घटनेचा जाहीर निषेध केला.

**1) स्त्रियांबाबत धर्माची भूमिका-** गांधी एकादश व्रतामध्ये ब्रह्मचर्याचे पालनाचा पुरस्कार करत असले तरी देखील भारतीय योग साधनेत सांगितलेले ब्रह्मचार्य व गांधीजींचे ब्रह्मचर्य यामध्ये स्त्रियांना गांधीजी दोषी मानत नाहीत. पारंपरिक योगमार्गातील सिद्ध पुरुषांनी योग्याने कोणत्याही स्त्रीशी संबंध ठेवू नयेत पूर्णपणे ब्रह्मचर्याचे पालन करावे अशी भूमिका

घेतली आहे. गांधीजी पारंपारिक ब्रह्मचर्य कल्पनेच्या पलीकडे जातात त्यांनी वैवाहिक कर्मचाऱ्यांचा पुरस्कार केला आहे.पती-पत्नींनी केवळ अपत्य प्राप्तीसाठी समागमाची मुभा देतात. मन काबुत राहत नसेल तर केवळ शरीर शुद्ध राखणे म्हणजे खरे ब्रह्मचर्य होय ज्यांना एवढा संयम अशक्यप्राय वाटेल त्यांनी चार चौघासारखे सरळ वैवाहिक जीवन जगावे स्वतःची फसवणूक करू नये अशी गांधीजी शिफारस करतात. गांधीजी येथे मध्ययुगातील विचारवंतांप्रमाणे स्त्रीला मोहाची मूर्तीमंत प्रतिमा अथवा पापाची खाण समजत नाहीत.स्त्री व पुरुष ही दोन परमेश्वराची दोन रूपे आहेत. दोघांना आत्मविकास करण्याचा समान अधिकार आहे स्वतःला वळण लावण्याचे देखील दोघांना स्वतंत्र अधिकार आहे म्हणून स्त्री स्वातंत्र्याचा त्यांनी पुरस्कार केला. स्त्री सहवासात राहून संयम राखणे हीच ब्रह्मचर्येची खरी कसोटी आहे असा त्यांचा म्हणण्याचा आशय होता.

**2) व्रतआचरण-** गांधीजी शरीर व मन यांच्यावर संपूर्ण नियंत्रण राखण्याच्या उद्देशाने व्रतआचरण मार्ग स्वीकारतात. एखादे व्रत स्वीकारणे म्हणजे मानसिक दुबळेपणाची लक्षण नाही तर उलट स्वतःचे सामर्थ वाढवण्याचे लक्षण आहे. एखाद्या व्रताचा स्वीकार करणे म्हणजे कोणत्याही परिस्थितीत ते व्रत न मोडण्याचा निर्धार करणे यातच त्याची थोरवी आहे. माणसाने व्रत पालन केले पाहिजे, व्रतस्थ वृत्तीचा मानव नसेल तर नांगर नसलेल्या जहाजाप्रमाणे तो वाऱ्यावर भटकत जाईल. अशी गांधीजींची भूमिका होती. गांधी कोणत्याही अघोरी व्रत किंवा उपासना पद्धतीला धर्मामध्ये स्थान देत नाहीत.

3) **मूर्तिपूजा**-गांधीजी धार्मिक वृत्तीचे होते परंतु त्यांनी आपल्या आयुष्यामध्ये कधीही मूर्तीपूजेला स्थान दिले नाही. त्यासंदर्भात ते यंग इंडिया मध्ये असे मत नोंदवतात, मूर्ती पूजेवर माझा विश्वास नाही. माझ्यामध्ये मूर्ती श्रद्धा जागवत नाही परंतु मला वाटते की, मूर्तिपूजा मानव स्वभावाचा एक भाग आहे. आपण प्रतिक्रियांच्या मागे धावत असतो इतर कोणत्याही ठिकाणापेक्षा चर्चमध्ये माणसाला अधिक शांततेचा अनुभव येतो, मूर्तीमुळे आराधनेला मदत होते. कोणताही हिंदू मूर्तीला देव समजत नाही मी मूर्ती पूजेला पाप समजत नाही.[10] (यंग इंडिय,6/10/1921 पृ. क्र. 328) गांधीजी मूर्ती पूजेच्या संदर्भात मूर्तिपूजेतून ज्यावेळेस कुप्रथेत रूपांतर होते त्यास विरोध करतात. मात्र गांधीजींच्या मते, जेव्हा मानव स्वतः पुढील आदर्श लहानशा आकृतीत समाविष्ट करून पहात असतो किंवा एखाद्या पुस्तकाला पवित्र मानून त्याचा आदर करत असतो ती देखील मूर्तीपूजाच असते. जेव्हा आम्ही पावित्र्याच्या व आदराच्या भावनेने मंदिरात,मशिदीत जातो तेव्हाही एक प्रकारे मूर्तीपूजाच करत असतो. यामधून कोणती हानी होत नाही. मूर्ती पूजा करून स्वतःच्या स्वार्थासाठी कोणीही क्षमता घेऊ नयेत. स्वतःच्या स्वार्थाकरिता मूर्ती पुढे जाऊन केलेली प्रार्थना वाईटच असते,असे गांधीजी मत नोंदवतात. हिंदू धर्मामध्ये मूर्तिपूजा आहे त्याचप्रमाणे ती इतर धर्मात देखील आहे. त्यांच्या मते, मशिदीला खुदाचे घर समजून तिच्या रक्षणाकरिता मुसलमान जीवावर का उदार होतात? ख्रिश्चन चर्चमध्ये बायबल हातात घेऊन शपथ का घेतात? मशिदी आणि चर्च यांच्या निर्मिती करता वारेमात पैसा देणे ही मूर्ती पूजाच होय. त्यामुळे सर्वच धर्मांमध्ये ईश्वर आराधनेचा मार्ग भिन्न आहे. सर्वजणच वेगवेगळ्या माध्यमातून ईश्वराची पूजा करत असतात. [11] (हरिजन, 13/03/1937 पृष्ठ क्र.39) गांधीजी सर्वच धर्मातील दोष या ठिकाणी स्पष्ट करतात. मूर्तीपूजा ही सत्याच्या आधारावरती असली पाहिजे व ती स्व स्वार्थासाठी नसली पाहिजे अशी गांधीजीचे भूमिका स्पष्ट होते.

3) **धर्म व राजकारण-** गांधीजींच्या मते, धर्म व राजकारण या भिन्नभिन्न बाबी नसून धर्माशिवाय राजकारण करणे शक्य नाही. सामाजिक व नैतिक प्रगती या अर्थाने राजकारणातील कामाकडे पाहिले पाहिजे.लोकशाहीत जीवनाचा कोणताही भाग राजकारणापासून वेगळा राहू शकत नाही.[12] (संदर्भ हरीजन,06/10/1946, पृष्ठ क्र. 341) माझ्या दृष्टिकोनातून धर्माशिवाय राजकारण केवळ घाण आहे व ते स्वयंपूर्ण ताज्या आहे. राजकारणाचा संबंध राष्ट्राशी असतो व ज्या गोष्टीचा संबंध राष्ट्रकल्याणाशी असतो तिचा संबंध धार्मिक प्रवृत्तीच्या म्हणजेच ईश्वर व सत्याचा शोध घेणाऱ्याशी असतो. माझ्या मते, ईश्वर व सत्य परस्परांचे पर्याय आहेत आणि कोणी जर मला पटवून दिले की ईश्वर असत्याचा वा यातनांचा ईश्वर आहे तर मी त्याची आराधना करणे बंद करून टाकेन. त्यामुळे राजकारणातही आपल्याला स्वर्गाच्या साम्राज्याची स्थापना करावयाची आहे.[13] (यंग इंडिया,18/06/1925 पृष्ठ क्र.214) थोडक्यात गांधीजी राजकारण हे वाईट नसून तसेच ते गलिच्छ लोकांचे नसून राजकारण हे धार्मिक वृत्तीतून म्हणजेच नैतिक बलातून केले पाहिजे. त्यामध्ये सत्याचा अंश म्हणजेच परमेश्वराच्या कृतीचा अंश असला पाहिजे अशी गांधीजींची भूमिका यातून स्पष्ट होते. (या ठिकाणी गांधीजींचे अनेक संदर्भ उपलब्ध आहेत.पण संशोधन पेपरच्या मर्यादा असल्याकारणाने मर्यादित संदर्भ सादर केले आहेत.)

4) **अस्पृश्यता**-अस्पृश्यतेला विरोध करताना गांधीजी असं म्हणतात की अस्पृश्यता कायम राहण्यापेक्षा हिंदू धर्म नाहीसा होणे अधिक चांगला.[14] (यंग इंडिया (26/11/1931, पृष्ठ क्रमांक 372) यावरून अस्पृश्यता हा हिंदू धर्मातील दोष आहे आणि तो आपण दूर केला पाहिजे अशी गांधीजींची भूमिका स्पष्ट होते.

**5) जाती वर्ण-** गांधीजींच्या मते, जाती अनावश्यक आहेत व प्रगती करता त्या बाधक आहेत मानसातील विषमतेवरही माझा विश्वास नाही. आपण सगळे समान आहोत परंतु समता आत्म्याचे आहे शरीराचे नाही त्यामुळे ही मानसिक स्थिती आहे या भौतिक जगात फार मोठी विषमता असल्यामुळे आपण समतेचा विचार करून तिच्या करिता प्रयत्न केला पाहिजे. स्पष्टपणे दिसणाऱ्या बाह्य विषमतेतून आपल्याला समता निर्माण करायचे आहे एका व्यक्तीने दुसऱ्या व्यक्ती पेक्षा स्वतःला मोठे समजणे हा ईश्वर व माणूस यांच्याविरुद्ध केलेला अपराध आहे त्यामुळे लहान मोठा असा भेद असणाऱ्या जाती वाईट आहेत.[15] (यंग इंडिया, 4/6/1931 पृष्ठ क्रमांक 129) जातिभेद भावना समाजातील सर्वच घटकांमध्ये खोल वरती पसरलेले आहे या विकृतीमुळे संपूर्ण मानव जात पीडित आहे खऱ्या अर्थाने धर्माची स्थापना करून ही व्यवस्था दूर केली पाहिजे कोणत्याही धर्मात अशा प्रकारच्या अडथळ्यांना व भेदभावांना स्थान नाही. अशी गांधीजींची भूमिका होती धर्माच्या दृष्टिकोनातून सर्व माणसे समान आहेत. या धर्माच्या सध्याच्या अवनत अवस्थेमध्ये प्रत्येकाने स्वछेने स्वतःला अतिशूद्र समजावे. हीच खऱ्या धर्माची प्रस्थापनेचा मार्ग आहे असे गांधीची स्पष्ट करतात.

**पौरात्य व पाश्चिमात्य विचारांची एकत्रीकरण-** भारतीय अध्यात्मामध्ये 'सर्व खल्विंद ब्रह्म' हे वेदांत दर्शनाचे मूलतत्त्व मानले जाते याउलट पाश्चात्य देशात मानव हाच विश्वातील सर्व गोष्टींचा मानदंड आहे. (Man is the major of all things) या सूत्राभोवती विचार गुंतलेले आहेत. गांधींची भूमिका यापेक्षा वेगळी होती. गांधींच्या मते, परमेश्वराने स्वतःची प्रतिकृती म्हणजे मानव तयार केला आहे. (Man is made in the image of God) परमेश्वराने दिलेली ही जन्मजात प्रतिष्ठा माणसाने सांभाळली पाहिजे. स्वतःच्या मनातील शूद्र मनोविकारांना शरण जाणे म्हणजे परमेश्वराचा अपमान करणे होय. थोडक्यात मानव म्हणजे परमेश्वराचा अवतार आहे, त्यांने परमेश्वर रूपी गुण सदैव आपल्यामध्ये सांभाळले पाहिजेत अशी गांधीजींची भूमिका होती. अहिंसा,सत्य,अस्तेय ब्रह्मचर्य,असंग्रह, शरीरश्रम अस्वाद, सर्वत्र भयवर्जन, सर्वधर्मीय, समानत्व, स्वदेशी आणि अस्पृश्यतेच्या कल्पनेला विरोध या एकादशव्रताचे गांधींच्या आश्रमात मनःपूर्वक पालन केले जाई. आत्म्याच्या उन्नतीसाठी विषय सुखाचा त्याग करण्याची शिकवण गांधींनी आपल्या अनुयायांना दिलेली आहे. व्रत आचरणाची गांधींची कल्पना पारंपारिक हिंदू धर्मापेक्षा आधुनिक युरोपातील निवृत्तीप्रवण धर्ममताशी अधिक जवळची होती. गांधींनी संन्याशी व गृहस्थ असे दोन निरनिराळे वर्ग सांगितलेले नाहीत संसारात राहून आपली कौटुंबिक व सामाजिक कर्तव्य पार पाडत असताना माणसाने एकादशव्रताचे पालन केले पाहिजे यावर गांधीजी ठाम होते.

गांधीजींच्या मते, प्रत्येक व्यक्तीने आपल्या अंतःकरणातील चैतन्याला स्मरून धार्मिक समजुती आचार विचार आणि नितीनियम याची चिकित्सा केली पाहिजे. धर्मामधील अनितीला, अन्यायाला विरोध करणे हे प्रत्येक धर्मनिष्ठ माणसाची कर्तव्य आहे. धर्माच्या आधारे अन्यायाचा संघटित प्रतिकार करण्याची सामान्य लोकांना शिकवण देणारे गांधी हे भारतातील पहिले धर्म सुधारक होते. [16] (गांधी, नलिनी पंडित, पृष्ठ क्र.10)

**मूल्यमापन-** गांधीजींच्या विचारसरणीत परतत्वभभिमुखता व ईहवाद, व्यक्तीस्वातंत्र्य व व्रतग्रहण परंपरेबद्दल आदर व परिवर्तनवादाच्या परस्पर विरोधी कल्पनांचा समन्वय दिसतो हा समन्वय त्यांनी बुद्धिनिष्ठ चिकित्सक पद्धतीने केलेला नसल्यामुळे त्यात तार्किक विसंगती आढळून येते. बालपणीच्या संस्कारातून काही कल्पना त्यांच्या मनात रुजल्या होत्या. परदेशात असताना नवे विचार,नव्या कल्पना त्यांनी जशा आत्मसात केल्या तसेच जुन्या संकल्पना बाबत त्यांना अभिप्रेत असणारा अर्थ हळूहळू बदलत गेला. तरीही सत्य आणि अहिंसा या मूल्यांचे बुद्धी परस्पर अनुसंधान राखल्याने त्यांच्या विचारात एक अंतरविसंगती आहे. गांधींनी सामान्य लोकांना चळवळीशी जोडत असताना धार्मिककतेची परिभाषा वापरली त्यामुळे सामान्य लोक स्वातंत्र्य चळवळीकडे आकर्षित झाले. गांधीजींच्या सुधारणावादी, धर्मसाधना, आध्यात्मिक प्रवृत्ती, इहवाद यांसारख्या विचारसरणीच्या समन्वयामुळे गांधीजींचे विचारातील वेगळेपण अनेकांनी जाणले नाही. धार्मिक विचारातील विसंगतीमुळे अनेक सुधारणावादी विचारक त्यांच्यापासून दुरावले. गांधीजींच्या विचारसरणीतील धर्मनिरपेक्ष राष्ट्रवाद, व्यक्तीची स्वयंसिद्ध प्रतिष्ठान, विश्वबंधुत्व या कल्पनांचे तरुणांना आकर्षण वाटले, परंतु त्यांच्या अंतर्मनाचा आवाज, रामराज्य, वर्णाआश्रम धर्म यांसारख्या संकल्पना तरुणांना ग्राह्य वाटल्या नाहीत. तरुण वर्गावरती 19 व्या शतकातील धर्मनिरपेक्ष बुद्धीनिष्ठ उदारमतवादाचे संस्कार झाले होते. त्यामुळे गांधींच्या आध्यात्मिक परिभाषेमुळे त्यांना प्रतिगामी ठरवण्यात आले. गांधींच्या विचारातील गर्भित अर्थाचे विश्लेषण करण्याची गरज कार्यकर्त्यांना वाटले नाही. परिणामतः गांधीजींचेधर्म विषयी विचार पुरोगामी असून देखील प्रतिगामी ठरले.

**संदर्भग्रंथ:-**

1) पंडित नलिनी, गांधी, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई,1983, पृ. क्र.2
2) आर के प्रभू आणि यु.आर. राव (सं) द माइंड ऑफ महात्मा गांधी, नवजीवन प्रकाशन, अहमदाबाद पृ क्र. 102

3) पटवर्धन सी.पु., महात्माजींचे सत्याचे प्रयोग अथवा आत्मकथा, (अनुवाद) सुलभ राष्ट्रीय ग्रंथमाला, पुणे 1951, प्रस्तावना पृ क्र.7

4) गांधी,'नॉन व्हायलंन्स इन पीस अँड वॉर' तिसऱ्या आवृत्ती, नवजीवन प्रकाशन, अहमदाबाद, १९४८, पृष्ठ क्र.392

5) पंडित नलिनी, गांधी, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई,1983, पृष्ठ क्रमांक-3

6) महात्मा खंड, पाच पृ. क्र. 206

7) पंडित नलिनी, गांधी, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई,1983, पृष्ठ क्र.8

8) कित्ता पृ. क्र.8

9) प्यारेलाल, (१९६५), दि अर्ली फेज खंड-एक, नवजीवन प्रकाशन, अहमदाबाद.

10) गांधी, हिंदू धर्म, पृ. क्र.295

11) यंग इंडिय,6/10/1921 पृ. क्र. 328

12) हरिजन, 13/03/1937 पृष्ठ क्र.39

13) हरीजन,06/10/1946, पृष्ठ क्र. 341

14) संदर्भ यंग इंडिया,18/06/1925 पृष्ठ क्र.214

15) यंग इंडिया (26/11/1931, पृष्ठ क्रमांक 372

16) यंग इंडिया, 4/6/1931 पृष्ठ क्रमांक 129

17) पंडित नलिनी, गांधी, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई,1983, पृ. क्र.2, पृष्ठ क्र.10